महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता


मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 04 मार्च 2025 ■ वर्षे 6 ■ अंक 247 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




थोडक्यात महत्वाचे

## कल्याण पूर्वेत आरोग्य शिबिर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण (वार्ताहर) :** नीलेश शिंदे फाउंडेशन, सहयोग सामाजिक संस्था आणि हर्ष आयुः यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी शिवाजी कॉलनीतील नीलेश शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयुर्वेद त्वचा आणि केस उपचार शिबिर आयोजित केले होते. याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिवसेना कल्याण पूर्व शहरप्रमुख नीलेश शिंदे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना आयुर्वेदाच्या शुद्ध आणि नैसर्गिक उपचारपद्धतींची माहिती मिळाली. डॉ. हर्षदा भदाणे यांनी नागरिकांना आयुर्वेदावर मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या त्वचा व केसांसंबंधीच्या तक्रारींवर प्रभावी उपचार दिले. प्राचीन आणि प्रभावी अशा आयुर्वेदिक उपचारपद्धतींचा स्वीकार करून नैसर्गिक आरोग्य जपण्याचा संकल्प या वेळी नागरिकांनी केला. या शिबिराला समाजसेवक देवचंद अंबादे, कालिदास कदम, संजय देवरे, रवी देवळे, विभागप्रमुख विष्णू गवस, सुभाष मते, उपविभागप्रमुख सागर घायवट, सुशिल कटारे, सहयोग सामाजिक संस्था अध्यक्ष विजय भोसले, शाखाप्रमुख सुरेश काळे, नितीन जावळे, भरत सटाळे तसेच अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## मध्य रेल्वेवरील वन रुपी क्लिनिक बंद

### ठेकेदाराचे गुजरातमध्ये पलायन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** ता ३, (वार्ताहर) परिसरातील गरीब व आपत्कालीन परिस्थितीत रेल्वे स्थानकात प्रवासी व रूग्णांना 1 रुपयांत तातडीने उपचार मिळावा म्हणून मध्ये रेल्वेने कळवा रेल्वे स्थानकावर सुरू केलेल्या 1 रुपी क्लिनिकवर सध्या फेरीवाले व भाजी फळे विक्रेत्यांनी अतिक्रमण केले असून 1 रुपी क्लिनिकसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीसाठी लाखो रुपयांचा खर्च फुकट गेला आहे.तसेच स्वच्छ व सुंदर रेल्वे स्थानकावर अवकळा आली आहे. कळवा मुंब्रा दरम्यान अनेक वेळा रेल्वे अपघात होतात त्यामुळे रात्री बेरात्री प्रवाश्यांना उपचाराची गरज भासते तसेच या रेल्वे स्थानकावर सकाळच्या वेळी खूप प्रवाशांची गर्दी असते साध्या उन्हाचे व उष्णतेचे वातावरण असल्याने अनेक प्रवासी रेल्वे स्थानकात बेशुद्ध पडतात, एखाद्या रुग्णाचे रक्तदाब वाढतो, गर्दीच्या वेळी एकदा प्रवासी गर्दीत गाडीत चढताना पडतो अश्यावेळी कळव्यात छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे 1 ते दीड किलो मीटर अंतरावर आहे असे असताना रेल्वे स्थानकातच त्याला उपचार मिळावा म्हणून १ रुपी क्लिनिकचा मोठा आधार ठरत असताना गेल्या काही महिन्यापासून कळवा रेल्वे स्थानकाला लागून असलेला 1 रुपी क्लिनिक बंद पडला आहे त्यामुळे या क्लिनिकसाठी रेल्वेने खर्च केलेले लाखो रुपये वाया गेले आहेत तसेच या जागेवर भाजी व फळे विक्रेत्यांचे अतिक्रमण झाल्याने परिसराचे सौंदर्य बिघडले आहे तसेच मध्य रेल्वेने प्रवाश्यांना मात्र वाऱ्यावर सोडल्याचे चित्र आहे.

**क्लिनिक इमारतीसाठी लाखो रुपयांचा खर्च वाया**

### ठेकेदाराचे गुजरातमध्ये पलायन...

मध्य रेल्वेच्या अनेक रेल्वे स्थानकात सुरू झालेले 1 रुपी क्लिनिक बंद पडले असून त्याचा निर्माता ठेकेदार डॉ राहुल घुले यांनी सध्या गुजरातमध्ये पलायन केल्याचे काही जणांचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांनी हे क्लिनिक चालवण्यासाठी केलेला करार अर्धवट सोडल्याने रेल्वेचे नुकसान व प्रवाशांचे नुकसान झाले आहे. रेल्वेस्थानकाच्या हद्दीत रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांच्या कारवाईचा देखावा कळवा रेल्वे स्थानक परिसरात रेल्वे हद्दीत आता पर्यंत रेल्वे सुरक्षा बळाच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत 90 फेरीवाल्यांवर कारवाई केली आहे मात्र रेल्वे सुरक्षा जवान निघून गेल्यावर फेरीवाले पुन्हा या परिसरात बसत असल्याने ते त्यांना जुमानत नसल्याचे दिसून येते.

> "1 रुपी क्लिनिक गेल्या काही दिवसांपासून बंद आहे मात्र या जागेवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे यावर पुन्हा रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानाकडून धडक कारवाई करण्यात येईल"
> ● पद्मजा गाजरे,स्थानक प्रबंधक,कळवा रेल्वे स्थानक

### मुंबई महानगराला २६ वर्षांनंतर मिळणार

# चार नवीन रेल्वे पोलीस ठाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबईतील लोकल प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आसनगाव, अंबरनाथ, भाईंदर आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे चार नवीन रेल्वे पोलीस ठाणी स्थापन करण्याच्या प्रस्तावाला गृहविभागाने मान्यता दिली आहे. त्यामुळे १९९९ नंतर महामुंबईत प्रथमच नव्या रेल्वे पोलीस ठाण्यांची निर्मीत होणार आहे. याशिवाय या पोलीस ठाण्यांसाठी लागणाऱ्या अतिरिक्त संख्याबळाकरीता २७९ नवीन पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

मुंबई महानगराची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या मुंबई लोकलमधून दररोज सुमारे ७५ लाख प्रवासी प्रवास करतात. प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना १९९९ पासून लोकलच्या तिन्ही मार्गांवर एकूण १७ रेल्वे पोलीस ठाणी आहेत. या पोलीस ठाण्यांमध्ये सुमारे चार हजार अधिकारी - पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. प्रवाशांची वाढती संख्या लक्षा घेता आसनगाव, अंबरनाथ, भाईंदर आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे चार नवीन पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव रेल्वे पोलिसांनी गृहविभागाला पाठवला होता. रेल्वे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी केलेल्या पाठवपुराव्यानंतर अखेर गृहविभागाने चार पोलीस ठाणी उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. मध्य रेल्वे मार्गावर कल्याण रेल्वे स्थानकानंतर थेट कसारा रेल्वे पोलीस ठाणे आहे. या दोन रेल्वे पोलीस ठाण्यांमधील अंतर ६७ किलोमीटर असून त्यादरम्यान सुमारे १२ स्थानकांचा समावेश आहे. दुसरीकडे कर्जत मार्गावर कल्याणनंतर थेट कर्जत रेल्वे पोलीस ठाणे आहे. त्या दोन स्थानकांमधील अंतर सुमारे ४६ किलोमीटर आहे. मध्य रेल्वेच्या कल्याण जंक्शनवर प्रमुख एक्स्प्रेस आणि लोकल थांबतात. शहाड, आंबिवली, टिटवाळा, वाशिंद, आसनगाव, खर्डी येथे मोठया संख्येने वसाहती आहेत. तेथून मुंबईत येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे शहाड ते खर्डीदरम्यान काही घटना घडल्यास तक्रारदारांना तक्रार करण्यासाठी कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात जावे लागते. तसेच उल्हासनगर, अंबरनाथ, नेरळ, भिवपुरी येथे लोकवस्ती वाढत असून तेथून मोठ्या प्रमाणात नागरिक मुंबईत येतात.

> **ठाणे जिल्ह्यात आसनगाव, अंबरनाथ, भाईंदर आणि मुंबईत लोकमान्य टिळक टर्मिनस येथील पोलीस ठाण्यांना गृहविभागाकडून मंजुरी**

पश्चिम मार्गावरील प्रवशांची संख्या वाढत असल्यामुळे बोरिवली व वसई दरम्यानही एका रेल्वे स्थानकाची आवश्यकता होती. बोरिवली रेल्वेची हद्द जोगेश्वरी - दहिसर, वसई रेल्वे पोलिसांची हद्द मीरा रोड - विरारपर्यंत आहे. भाईंदर येथील नवीन पोलीस ठाण्यामुळे वसई रेल्वे पोलीस ठाण्याचा भार हलका होणार आहे. तसेच मुंबईतील कुर्ला येथील लोकमान्य टिळक टर्मिनसवरील प्रवाशांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. येथून दररोज सुमारे ६० लांबपल्ल्याच्या रेल्वे सुटतात. एलटीटीमध्ये सध्या दररोज दीड लाखाहून अधिक प्रवासी येतात. एलटीटी स्थानक सध्या कुर्ला रेल्वे पोलिसांच्या हद्दीत येते. पण कुर्ला रेल्वे पोलिसांची हद्द व वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता एलटीटीमध्येही स्वतंत्र रेल्वे पोलीस ठाणे आवश्यक होते. या पोलीस ठाण्याअंतर्गत गोवंडी, मानखुर्द आणि हार्बर मार्गावरील वडाळा ते गोरेगाव स्थानकांचा समावेश करता येईल. त्यामुळे कुर्ला रेल्वे पोलिसांचा बराचसा भार हलका होईल. या चार पोलीस ठाण्यासाठी २७९ नवीन पदे निर्माण करणासाठी २५ कोटी एवढ्या आवर्ती खर्चाला व एक कोटी २१ लाख अनावर्ती खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापतीपदी गजानन पाटील




# विधानपरिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर

**विधान परिषदेतील पक्षनिहाय संख्याबळ**

एकूण 78
महायुती - 32
भाजप 19
शिवसेना 6
राष्ट्रवादी 7

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकानंतर आता विधानपरिषदेच्या 5 जागांसाठीची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे, आता विधानपरिषदेच्या या 5 जागांवर कोणाचा नंबर लागणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. विधान परिषदेच्या रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून 27 मार्च रोजी मतदान प्रकिया पार पडणार आहे. त्यासाठीचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे.

भाजपच्या 3, राष्ट्रवादी अजित पवार 1 आणि शिवसेना शिंदे गटाच्या 1 आमदारांसाठी ही निवडणूक पार पडणार असून या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार केवळ आमदारांना असणार आहे. सध्या, राज्यात भाजप महायुतीला मोठं बहुमत असल्याने या जागांवर पुन्हा संबंधित पक्षाचेच उमेदवार विजयी होतील. मात्र, राजकीय पक्षांकडून कोणाला संधी मिळणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

**असा असेल निवडणूक कार्यक्रम !**

- 10 मार्च ते 17 मार्च अर्ज भरण्याची प्रक्रिया
- अर्जाची छाननी 18 मार्च रोजी होणार
- 20 तारखेला अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस
- 27 तारखेला विधान परिषदेच्या जागांसाठी मतदान घेण्यात येणार आहे.

विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे विधानपरिषदेवर असलेल्या 5 आमदारांच्या जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामध्ये, शिवसेना शिंदे गटाचे आमदार आमशा पाडवी, राष्ट्रवादी काँग्रेस राजेश विटेकर, भाजप आमदार प्रवीण दटके, भाजप गोपीचंद पडळकर आणि भाजपा रमेश कराड या सदस्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. आता, या रिक्त जागांसाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीकडून कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कल्याण आगारातील महाकाय खड्ड्यामुळे लाखो प्रवाशांचा जीव टांगणीला






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण बस आगारत बस येण्या जाण्याच्या मार्गांवर भला मोठा खड्डा खोदल्याने बस आगारात ये जा करण्यासाठी मोठी अडचण येत आहे.स्मार्ट सिटीच्या नावाखाली कल्याण बस आगार ताब्यात घेण्याचा हा घाट असून असे झाल्यास कल्याण बस अगारातून दररोज एक लाखाहून अधिक प्रवाशांना. मोठा मनस्ताप सहन करावा लागणार आहे.कल्याण बस आगारातून मुरबाड, भिवंडी, वाडा, पालघर, अहमदनगर, आळेफाटा, कल्याण ग्रामीण सह पडघा, गणेशपुरी, पनवेल, बदलापूर अशी बस सेवा सुरु आहे. स्मार्ट सिटी च्या नावाखाली बस डेपोचे नूतनिकरण सुरु आहे. मूळ बस आगाराची जागा बलकावून हे स्मार्ट सिटीच्या नावाने सुरु असलेल्या कामात क्रीम प्रोजेकटं म्हणून ही मोक्याची जागा हडफ केली जात आहे. येथील बस डेपो प्रशासन विठलवाडी बस डेपोत स्थलांतरित केले आहे.त्यामुळे आधीच प्रवाशी त्रस्त आहेत, आता येथील बस ची ये जा कायमची बंद करावी या हेतूने स्मार्ट सिटी प्रकल्प राबविणाऱ्या येजन्सीने मनमानी करत आपल्या हुकूमाप्रमाणे बस चा मार्ग रोखण्यासाठी हा खड्डा खोदल्याची चर्चा येथील प्रशासन करत आहे. रेल्वे स्थानका जवळील कल्याण बस आगाराची जवळपास आठ ते दहा एकर जमीन स्मार्ट सिटी च्या प्रकल्प राबविण्याच्या नावाखाली घेण्यात आली, येथे ना बस स्थानक ना बसेस त्यामुळे ग्रामीण, शहरी सर्वच प्रवाशी हैराण झाले आहेत.

# एसटी महामंडळात आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक

### - राज्यमंत्री माधुरी मिसाळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई :** राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या पुण्यातील स्वारगेट स्थानकात घडलेल्या घटनेच्या निमित्ताने महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून या अनुषंगाने नुकतीच एसटी महामंडळ आणि पोलिसांची एक तातडीची बैठक आयोजित करून या घटनेचा विस्तृत आढावा घेण्यात आला. दरम्यान, एलटी स्थानकांमधील सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात येणार असून एसटी महामंडळात एक सुरक्षा रक्षक समिती स्थापन करून त्यात आयपीएस दर्जाचा सुरक्षा अधिकारी नेमण्यात येणार असल्याचे परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये प्रवासी तरुणीवर २५ फेब्रुवारी बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली. आरोपी दत्तात्रय गाडेने तरुणीकडे वाहक असल्याची बतावणी केली होती. तरुणीवर बलात्कार करून पसार झालेल्यागाडेला शिरुर तालुक्यातील गुनाट गावातून पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री अटक केली. गाडेला १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर माधुरी मिसाळ यांनी एसटी महामंडळ आणि पोलीस अधिकाऱ्यांची शनिवारी आढावा बैठक घेतली. यावेळी पोलीस प्रशासन, एसटी महामंडळ, परिवहन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्य परिवहन (एसटी) महामंडळामध्ये पूर्वीसारखे सुरक्षा दक्षता अधिकारी नव्याने नेमण्यात येतील. तसेच पोलिसांची गस्त वाढविण्यात येईल. स्वारगेट स्थानकात यापूर्वी सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे सीसी टीव्ही कॅमेऱ्यांच्या संख्येत आता वाढ करण्यात येईल. महिला सुरक्षेच्यादृष्टीने अधिक उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यामुळे शक्य तेवढ्या लवकर या उपाययोजना करण्यात येतील. या प्रकरणाच्या तपासात जे कोणी अधिकारी किंवा ठेकेदार दोषी आढळतील त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असे माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

### तहसीलदारांची धडक कारवाई

# भिवंडीतील वाळू माफियांच्या बोटी भस्मसात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - भिवंडी खाडी किनारा भागातील दिवे, खारबाव, केवणी, पिंपळास, कोन परिसरात दिवसा, रात्री पुन्हा वाळू माफियांकडून वाळूचा उपसा करण्यात येत आहे, अशी माहिती मिळाल्यावर भिवंडीचे तहसीलदार अभिजीत खोले यांनी कारवाई पथकाला सोबत घेऊन वाळू उपसा करणाऱ्या सर्व बोटी जप्त केल्या.



या बोटी खेचकाम यंत्राने खाडी किनारी आणून त्या कापकाम यंत्राने कापून, त्यांचे तुकडे करून त्या पेट्रोल टाकून भस्मसात केल्या. जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, भिवंडीचे उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. महसूल विभागाकडून दिवसा वाळू उपसा करताना कारवाई होत असल्याने भिवंडी भागातील दिवे, केवणी, खारबाव, पिंपळास, कोन भागातील वाळू माफिया संध्याकाळी सात वाजल्यानंतर ते पहाटे चार वाजेपर्यंत खाडीत वाळू उपसा करून रात्रीतून वाळूचे वहन करत असल्याच्या तक्रारी भिवंडीचे तहसीलदार खोले यांच्याकडे आल्या होत्या.

दिवसा या वाळू उपसा बोटी खारफुटीचे जंगल, खाडी किनारची झाडे यांच्या आडोशाला उभ्या करण्यात येत होत्या. या बोटी दिवसा खाडी किनारी भागात वाळू माफियांकडून उभ्या करण्यात येतात याची पक्की माहिती मिळाल्यावर तहसीलदार खोले यांनी महसूल विभागाचे तोडकाम पथक, कापकाम यंत्र सोबत घेऊन खारबाव, दिवे, केवणी, पिंपळास, कोन खाडी किनारा गाठला. त्यावेळी काही वाळू माफिया खाडीत वाळू उपसा करत होते. ते महसूल विभागाच्या पथकाला पाहताच खाडीत उड्या मारून पळून गेले.

वाळू माफियांच्या झाडांच्या, खारफुटी जंगलाच्या आडोशाने उभ्या केलेल्या वाळू माफियांच्या बोटी खेचकाम यंत्राच्या साहाय्याने खाडी किनारी आणण्यात आल्या. या बोटी कापकाम यंत्राने कापून त्यांचे तुकडे करण्यात आले. त्यानंतर या बोटींना पुन्हा वापरता येणार नाही अशा पध्दतीने पेट्रोल टाकून जाळून टाकण्यात आल्या. अशाप्रकारे आठ ते नऊ बोटी, सक्शन पंप अधिकाऱ्यांनी जाळून टाकल्या. या कारवाईने वाळू माफियांचे कंबरडे मोडले आहे.


> भिवंडी खाडी किनारा भागात दिवसा, रात्री चोरून वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी होत्या. या तक्रारींची खात्री केल्यानंतर वाळू तस्करांच्या बोटी खाडी किनारी आणून त्या तोडून जाळून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे वाळू माफियांच्या बोटी, सक्शन पंप नष्ट करण्यात आले. ही कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे.
> ● अभिजीत खोले, तहसीलदार, भिवंडी.



# कल्याण डोंबिवलीत वर्ग -२ च्या जमिनीवर टोलेजंग इमारती

## कल्याण डोंबिवलीत महारेरा पाठोपाठ आणखी एक घोटाळा?

कल्याण डोंबिवलिसह आसपासच्या परिसरात ८९६ इमारती तक्रारदार पांडुरंग भोईर यांची माहिति



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवलीत सरकारी वर्ग -2 च्या जमिनीवर टोलेजंग इमारती उभारल्या असून कल्याण डोंबिवलिसह आसपासच्या परिसरात अशा 896 इमारती आहेत. कल्याण डोंबिवलीत महारेरा पाठोपाठ आणखी एक घोटाळा समोर आला असून अडीच हजार कोटींहून अधिकचा घोटाळा झाला असल्याचा आरोप तक्रारदार पांडुरंग भोईर यांनी केला आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमताने बिल्डरने शासनाचा कोट्यवधीचा महसूल बुडवल्याचा आरोप भोईर यांनी केला असून तत्कालीन केडीएमसी आयुक्त, नगररचनाकार, रजिस्ट्रार, जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी त्यांनी केली आहे.

या संदर्भात तक्रारदार भोईर यांनी माहिती दिली आहे की, सरकारी वर्ग दोनच्या जागेवर बेकायदा बांधकामे उभी राहिली असल्याची तक्रार भोईर यांनी केली आहे. ठाणे जिल्ह्यातील ७० सोसायट्यांना सरकारी भूखंडाचे वाटप करण्यात आले होते. त्यापैकी ठाणे, कल्याण आणि अंबरनाथ याठिकाणी भूखंडाचे वाटप केले होते. २हजार ९१९ भूखंड वाटप करण्यात आले होते. त्यापैकी १ हजार ६८९ भूखंडावर शर्तभंग करण्यात आला आहे. त्यापैकी ७१३ भूखंड नियमानुकूल करण्यात आले. भोईर हे २०१६ पासून या प्रकरणी पाठपुरावा करीत आहे. त्याचबरोबर त्यांनी न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. ही याचिका न्यायप्रविष्ट आहे.

याशिवाय त्यांनी लोकायुक्तांकडे तक्रार केली आहे. तक्रारदार भोईर यांनी सांगितले की, २०११ ते २०१८ या कालावधीत योजनाच नसताना मंजूरी दिली गेली. वर्ग दोनच्या सरकारी जागेवर हमी पत्राच्या आधारे बांधकाम परवानगी देण्याची तरतूद नाही तरी देखील कल्याण डोंबिवली महापालिकेच्या नगररचना विभगातील तत्कालीन अधिकरी आणि आयुक्तांनी परवानगी देण्यात आल्या आहेत. या परवानग्या कशाच्या आधारे दिल्या गेल्या असा सवाल भोईर यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणात २ हजार ५०० कोटी रुपयांचा महसूल बुडाला असल्याचे भोईर यांनी सांगितले. कदाचित सरकारने काही मध्यस्थी केली तर ६५ बेकायदा इमारती प्रकरणातील इमारती नियमीत होण्याची शक्यता आहे. मात्र सरकारी वर्ग दोनच्या जागेवरील बेकायदा बांधकामे कशाच्या आधारे नियमित करणार असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

# फिरकीचा जादूगार शेन वॉर्न



बरोबर तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ( ४ मार्च २०२२ ) क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादुगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज दोन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले.

१३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्टया वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या ऍशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सळो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक ग्याटिंग ऑफ साईडला चेंडू टाकला. ग्याटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे.

शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता.

शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछाडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता.

निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले.

शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

-श्याम ठाणेदारदौंड जिल्हा पुणे

# गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः । त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ४-९ ॥

हे अर्जुना, माझा जन्म आणि कर्म दिव्य अर्थात निर्मळ आणि अलौकिक आहे. असे जो मनुष्य तत्त्वतः जाणतो, तो शरीराचा त्याग केल्यावर पुन्हा जन्माला येत नाही, तर मलाच येऊन मिळतो. ॥ ४-९ ॥

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः । बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ ४-१० ॥

पूर्वीसुद्धा ज्यांचे आसक्ती, भय आणि क्रोध पूर्णपणे नाहीसे झाले होते आणि जे माझ्यात अनन्य प्रेमपूर्वक स्थित राहात होते, असे माझा आश्रय घेतलेले पुष्कळसे भक्त वर सांगितलेल्या ज्ञानरूपी तपाने पवित्र होऊन माझ्या स्वरूपाला प्राप्त झालेले आहेत. ॥ ४-१० ॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् । मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ४-११ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जे भक्त मला जसे भजतात, मीही त्यांना तसेच भजतो. कारण सर्वच मानव सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात. ॥ ४-११ ॥

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः । क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ ४-१२ ॥

या मनुष्यलोकात कर्मांच्या फळाची इच्छा करणारे लोक देवतांची पूजा करतात. कारण त्यांना कर्मांपासून उत्पन्न होणारी सिद्धी लवकरच मिळते. ॥ ४-१२ ॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ ४-१३ ॥

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांचा समूह, गुण आणि कर्म यांच्या विभागाने मी निर्माण केला आहे. अशा रीतीने त्या सृष्टिरचना इत्यादी कर्मांचा मी कर्ता असूनही मला-अविनाशी परमात्म्याला-तू वास्तविक अकर्ताच समज. ॥ ४-१३ ॥

# कल्याणमध्ये आज काँग्रेसचे धरणे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गेल्या पाच वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झालेल्या नाही आणि सध्या परिस्थितीत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट सुरू आहे. आशा परिस्थितीत जनतेचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. शैक्षणिक, आरोग्य, पाणी, सुरक्षा सर्व बाबतीत महापालिका हद्दीत बोजवारा उडालेला आहे. निवडणुका न झाल्याने अधिकाऱ्यांवर अंकुश राहिलेला नाही त्या मुळे अधिकारी मनमानीने काम करीत आहेत. याकडे केडीएमसी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कल्याणमध्ये कल्याण शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज मंगळवारी केडीएमसी मुख्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी दिली.

# सिंचन विहीर या संकल्पनेतून शेतकऱ्यांसह - गावकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न मिटला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके - अंबाडी: पालघर जिल्हातील विविध आदिवासी बहुल भागामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि दुष्काळ असताना वाडा तालुक्यातील गोराड वडपाडा व वसई तालुक्यातील थळयाचापाडा या गावामध्ये प्रसाद चिकित्सा,गणेशपुरी यांच्या प्रयत्नामुळे हे चित्र पालटले आहे. काही महिन्यापूर्वी दुष्काळाचे चटके सोसणारे आणि पाण्यासाठी वणवण भटकंती करणारे हे गावे पाण्याच्या उपलब्धतेने सुखावले आहेत. प्रसाद चिकित्सा संस्थेद्वारे गावकऱ्यांच्या साह्याने केलेल्या प्रयत्नाचे हे यश आहे.या गावामध्ये मार्च महिन्यानंतर पाण्यासाठी महिलांना पायपीट करावी लागत असत.प्रसाद चिकित्सा धर्मादाय संस्थेने विहिरीसाठी नवीन जागा शोधून ती खणली व नवीन विहीरी बांधून दिल्या आहेत.यामुळे




लोकांना आता भरपूर प्रमाणात पाणी मिळाले आहे.आणि त्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती पण थांबली आहे.पाण्यासाठी आम्हालाही वणवण करावी लागत असे.मात्र या त्रासातून आता आमची सुटका झाली आहे,असे सौ सुजाता वळवी सांगतात. पाण्यासाठी भटकंती दूर करण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा या विचाराने आपण आतापर्यंत 11 नवीन विहिरी, 15 विहिरीची दुरुस्ती करण्यात आली आहे. आदिवासी भागात नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी आजतागायत 2558 वॉटर फिल्टर वाटप करण्यात आले आहे.तसेच शेतकऱ्यांना 55 विहिरी बांधून देण्यात आल्या आहेत. जेणेकरून शेतकऱ्यांना दुबार पीक घेता यावे हा मुख्य उद्देश आहे.यासाठी क्रोडा कंपनी,रोटरी क्लब आणि प्रसाद प्रोजेक्ट यांचे सहकार्य लाभले.असे संस्थेचे कार्यकारी व्यवस्थापक श्री मिलिंद नरगुंद यांनी सांगितले.

## डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने

# केडीएमसी परिसरात स्वच्छता अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण डोंबिवली परिसरात आज स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कल्याण मध्ये छत्रपती शिवाजी चौकापासून या अभियानाचा प्रारंभ झाला. आमदार सुलभा गायकवाड, माजी आमदार नरेंद्र पवार, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव, स्वच्छ भारत अभियानाचे ब्रँड ॲम्बेसिडर डॉ. प्रशांत पाटील, सहा. आयुक्त प्रीती गाडे, धनंजय थोरात तसेच महापालिकेच्या




इतर अधिकारी, कर्मचारी वर्गाने आणि डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सुमारे 2500 अनुयायांनी या स्वच्छता अभियानात आपला सहभाग नोंदविला.

डोंबिवलीतही इंदिरा गांधी चौकापासून या स्वच्छता अभियानास प्रारंभ झाला, आमदार राजेश मोरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, सहा. आयुक्त हेमा मुंबरकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे तसेच घनकचरा व्यवस्थापन




विभागातील शरद पांढरे, अगस्तीन घुटे तसेच इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आणि डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सुमारे 2000 अनुयायांनी या स्वच्छता मोहिमेत उस्फुर्त सहभाग घेतला.

### महापालिका परिक्षेत्रातील आमदार , माजी आमदार यांचा देखील स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग

तर डोंबिवली पश्चिमेत आमदार रवींद्र चव्हाण यांनी देखील अनेक नागरिकांसमवेत, आपल्या सहकाऱ्यांसमवेत तसेच डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या अनुयायांसमवेत स्वच्छता अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदविला.आमदार रवींद्र चव्हाण, सुलभा गायकवाड, राजेश मोरे आणि माजी आमदार नरेंद्र पवार यांनी स्वच्छता अभियानासाठी केलेल्या मदतीबाबत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे अनुयायांना धन्यवाद दिले.स्वच्छता ही केवळ महापालिकेचीच नव्हे तर स्वतःची देखील जबाबदारी आहे ही जाणीव या शहरातील प्रत्येक व्यक्तीस झाली तर शहर स्वच्छ व सुंदर होण्यास वेळ लागणार नाही असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी यावेळी काढले. तर कल्याण डोंबिवली नगरी स्वच्छ सुंदर व पर्यावरण पूरक करण्यासाठी महापालिका अधिकारी कर्मचारी वर्गाबरोबरच महापालिकेचे पदाधिकारी, नागरिक विविध एनजीओज यांनी देखील आपले योगदान द्यावे असे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी यावेळी केले.

## रेसिपी

# मटारचे कटलेट



उद्यापासून नवीन आठवड्याची सुरुवात होईल. आठवड्याची सुरुवात म्हणजे ऑफिस आणि शाळेसाठी सकाळी काहीतरी डब्याला बनवणे. यासाठी स्त्रिया अगदी संध्याकाळपासूनच तयारी करायला सुरुवात करतात. डब्यासाठी पोळी-भाजी बनवण्याबरोबर नाश्ता सुद्धा बनवावा लागतो. मग नाश्ता काय बनवायचा हा सुद्धा विचार करावा लागतो. जर तुम्हालाही असाच प्रश्न पडला असेल. तर इन्स्टाग्रामवर व्हायरल होणारा हा व्हिडीओ नक्की बघा... एका युजरने यावर कुरकुरीत नाश्ता बनवण्याची सोपी रेसिपी सांगितली आहे.


साहित्य :

१. पाणी,२. मीठ,३. मटार,४. कांदा, ५. गाजर,६. ढोबळी मिरची,७. पनीर,८. गरम मसाला,९. पावभाजी मसाला,१०. चाट मसाला,११. हळद १२. लाल तिखट,१३. कस्तुरी मेथी, १४. जिरा पावडर,१५. कोथिंबीर, १६. मक्याचे पीठ,१७. बेसन

# रेशनिंग कार्यालयातील गैरप्रकार थांबविणे व अन्य समस्यांबाबत निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिम ३८फ शिधावाटप कार्यालयातील गैरप्रकार तसेच अन्य समस्यां दूर करण्यासाठी रेशनिंग कृती समितीच्या वतीने २८ फेब्रुवारी रोजी आंदोलन करण्यात येणार होते. परंतु दहावी व बारावीच्या परिक्षा सुरु असल्याने आंदोलन पुढे ढकलण्यात आल्याची माहिती रेशनिंग कृती समितीचे अध्यक्ष राम बनसोडे यांनी सांगितले आहे. यावेळी माजी नगरसेवक भिमराव डोळस, सुनील घेगडमल, सतीश दराडे, सनी कांबळे, सोमनाथ राऊत, वैभव दाभाडे, आर टी सुरळकर व कृती समितीचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. याबाबत राम बनसोडे यांनी सांगितले की ३८ फ रेशनिंग अनेक कार्यालयातंर्गत विविध नागरीकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्यांबाबतचे लेखी निवेदन शिधावाटप कार्यालयात दिले. कल्याण शिधावाटप कार्यालयातुन दिलेल्या रेशन



कार्डधारकांना अद्यापही अन्य धान्य मिळत नाही ते लवकरात लवकर मिळवून देणे. कल्याण पूर्व मध्ये अद्यापही शिधावाटप कार्यालय नसल्याने खूप मोठ्या प्रमाणात व लांब पल्ल्यातून नागरिकांना कल्याण पश्चिम मध्ये यावे लागते यासाठी कल्याण पूर्व नवीन शिधावाटप कार्यालय सुरू करणे. शासन निर्णय असताना पत्रावरती नागरिकामे झाली पाहिजे, ३८ व कार्यालयातून अनावश्यक कागदपत्रे मागणी ही त्वरित

### रेशनिंग कृती समितीचा पुढाकार

थांबवावी व नागरिकांची कामे जलदगतीने करावीत. कल्याण 38 व शिधावाटप कार्यालयाची दक्षता समिती त्वरित गठीत करून मासिक बैठकांची सुरुवात करावी. या व इतर प्रमुख मागण्या द्वारे रेशनिंग कृती समितीने निवेदन देऊन मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# केडीएमसी शाळांमध्ये ५०२ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची नजर

## केडीएमसी शाळांची सुरक्षा सी.सी.टी.व्ही.च्या निगराणीत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासन आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता महानगरपालिकेच्या एकूण 61 शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आली असून 502 सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आले आहेत.

शासन निर्णयानुसार खाजगी, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते, त्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने तात्काळ सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेतले होते. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. शाळेतील सीसीटीव्ही यंत्रणेची ठराविक अंतराने फुटेज तपासणी व काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असणार आहे. मुख्याध्यापकांनी आठवड्यातून किमान तीन वेळा फुटेज तपासणी करणे आवश्यक राहील. शाळेतील सीसीटीव्ही फुटेज मध्ये काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास याबाबत स्थानिक पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. महापालिकेच्या एकूण 61 शाळांमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे सुरक्षिततेकरिता एकूण 502 कॅमेरे बसविण्यात आले असून सर्व शाळांमध्ये मुख्याध्यापक यांच्या कक्षात सीसीटीव्ही मॉनिटर बसविण्यात आले असल्याची माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.



## डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे

# स्वच्छता अभियान संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : आध्यात्मिक शिक्षण,आरोग्य,सामाजिक कार्य, व वृक्षारोपण आदि क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असणारे महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त निरुपणकार डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांनी स्थापन केलेल्या प्रतिष्ठानच्या विद्यमाने दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतात,त्यापैकीच रविवार दिनांक-2/3/2025 रोजी सकाळी 7.30 ते 11.00 वा.पर्यंत भिवंडी तालुक्यातील झिडके-अंबाडी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील झिडके-अंबाडी नाका चौकातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा तसेच महत्वाच्या रहदारीच्या ठिकाणची साफसफाई करून,सुमारे 39 हजार 600किलो वजनाचा ओला व सुका कचरा गोळा करून,ट्रॅक्टरमधून वाहतूक करून अंबाडी ग्रामपंचायत हद्दीतील डंपिंग ग्राऊंडवर त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

या स्वच्छता अभियान मोहीमेत जवळपास 800 स्वच्छतादूत,गणेशपुरी पोलीस कर्मचारीवर्ग,झिडके-अंबाडी ग्रामपंचायत,आरोग्य विभाग,ज्ञानेश्वर मंदीर कमिटी आदिंचा उत्स्फुर्तपणे सहभाग होता. परिसरातून या उपक्रमाचे जनमानसातून अभिनंदन करण्यात येत आहे,मानवी जीवनात स्वच्छतेचे महत्त्व जाणून ते अंगिकारण्याची प्रेरणा या अशा उपक्रमातून घेतली जात आहे.



# पडघा येथे 'मराठी भाषा गौरव' दिन साजरा





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे विविध कार्यक्रमाव्दारे "मराठी भाषा गौरव" दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

श्री शारदा अँकेडमीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष व सल्लागार शंशाक तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली "मराठी भाषा गौरव" दिनानिमित्त मराठी अभिजनाचा सन्मान सोहळा कार्यक्रम जिल्हा परिषद मराठी शाळा प्रांगणात शनिवारी सायंकाळी घेण्यात आला यावेळी आयोजीत कवी संमेलनात पंचक्रोशीतील १५ कवींनी सहभाग घेऊन शेतकऱ्यांची व्यथा,अमावस्या, मी महाराष्ट्र, मि कुणाला कळलो नाही, कफन दादा, माय मराठी, अंतीम अग्नी, बंद पडणारी मराठी शाळा, लग्न, स्त्री, पुन्हा नव्याने सुरुवात कर, माय मराठी, समुद्र राजा, शाळेत जिजाऊ, रमाई, सावित्री, शिकवाना या विषयांवर सुश्राव्य कवीता, गझल, पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तर उपस्थीत शिवसेना उबाठा गटाचे उपनेते विश्वास थळे यांनी, "मुलगी, पोरकी मराठी, वडील" यावर कवीता सादर करून उपस्थितांची वाहवाह मिळवली. यावेळी शारदा अँकेडमीच्या वतीने सुबक रांगोळी, आकर्षक चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते प्रकाश पाटील समाजसेवीका पुष्पलता पाटील सरपंच रविंद्र विशे उपसरपंच निता दास माजी सरपंच प्रभावती जाधव माजी उपसभापती गुरूनाथ जाधव, वृषाली विशे उपस्थित होते यावेळी श्री शारदा अँकेडमी करीत असलेल्या उपक्रमाचे कौतुक करुन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रकाश पाटील यांनी आपल्या भाषणात सांगुन शारदा अँकेडमीच्या पदाधिकारी, सदस्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्रकाश पाटील व विश्वास थळे यांच्या हस्ते शारदा अँकेडमीच्या यु. ट्युब चॅनेलचे उद्घाटन करण्यात आले यावेळी उपस्थित कवी, लेखक, पत्रकार,परिसरातील विवीध शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, चित्रकार, रांगोळी रेखाटणारे कलाकार, सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा शाल, पुष्पगुच्छ, तुळशीचे रोप, सन्मानचिन्ह, देऊन गौरव करण्यात आला. यावेळी श्री शारदा अँकेडमीच्या अध्यक्ष सेजल तांबोळी उपाध्यक्ष आश्वीनी गायकवाड, चिटणीस मयुरी बिडवी, खजिनदार ममता शेलार कार्याध्यक्ष उषा आगोणे सदस्य सानीका पारधी उज्वला जाधव, नितीशा म्हात्रे, चेतना वांळज टी. ए. पाटील शळेचे राईज प्री स्कुल चे मुख्याध्यापक रामचंद्र थोरात शिक्षक संजय चौधरी अनिल शेलार उपस्थीत होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक शंशाक तांबोळी यांनी तर सुत्रसंचालन अमर राऊत यांनी केले

# पाण्यासाठी कळव्यातील नागरिकांचा 'मनसेच्या'मदतीने पालिकेवर मोर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कळवा : विटाव्यातील खाडीकडेच्या लक्ष्मी विद्यालय परिसरातील चाळींमध्ये गेल्या गेल्या दोन महिन्यापासून नियमित पाणी येत नसल्याने पाणी टंचाईला कंटाळून अखेर या रहिवाश्यांनी सोमवार (ता 3) ला मनसेचे उपशहर अध्यक्ष सुशांत सूर्यराव व सामजिक कार्यकर्त्या ऋता आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली विटाव्यातील रहिवासीयानी मोर्चा काढला व गेल्या 2 महिन्यापासून बंद पाणी टंचाई दूर करण्याची मागणी केली.लक्ष्मी विद्यालय मागील चाळी मध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन मध्ये कचरा अडकल्याने दोन महिन्यापूर्वी रहिवाश्यांनी तक्रार केल्यावर पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांनी पाइपलाइन साफ करण्याचा दिखावा केला मात्र पाच ते सहा दिवस येथील रहिवाश्यांना पाण्यासाठी जिकडे तिकडे वणवण करावी लागत होते व पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते.पाणी पुरवठा होत नसल्याने रहिवासी हवालदिल झाले होते वारंवार तक्रार करूनही पाणी येत नव्हते मात्र पाणी पुरवठा अधिकारी एमआयडीसी कडून पाणी पुरवठा होत नसल्याचे कारण सांगत नागरिकांना सांगत होते मात्र सोमवारी मनसेचे सुशांत सूर्यराव व सामजिक कार्यकर्त्या ऋता आव्हाड यांनी या विटाव्यातील रहिवासीसह कळवा प्रभाग समितीवर मोर्चा काढून पाणी पुरवठा अधिकारी व अभियंता यांना जाब विचारला व पाणी पुरवठा नियमित करण्याची मागणी केली. अधिकाऱ्यांनी येत्या 15 दिवसांत पाणी पुरवठा नियमित करण्याचे आश्वासन दिले.

> " या भागात पाईप लाईन चॉकअप झाल्याने उद्या पासून नवीन पाईप लाईन टाकून पाणी वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे"
> - अतुल कुलकर्णी उपअभियंता,
> पाणी पुरवठा विभाग कळवा प्रभाग समिती

# नवीन संचमान्यतेमुळे विद्यार्थ्यांवर अन्याय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुलुंड: राळेगाव तालुका शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय कारवटकर यांनी खंत व्यक्त केली . महाराष्ट्र शासनाने सन २०२४-२५ साठी लागू केलेल्या संचमान्यतेच्या नव्या निकषांमुळे विद्यार्थी आणि शिक्षकांवर अन्याय होत आहे. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ (RTE) नुसार शिक्षक नियुक्तीसाठी ठरवलेले मूळ निकष केंद्र शासनाने निश्चित केले आहेत. मात्र, महाराष्ट्र शासनाने या मूळ निकषांना बगल देत स्वतःचे निकष तयार करून नवीन संचमान्यता जाहीर केली. दि. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार आज जाहीर केलेल्या संचमान्यतेत अनेक विषय शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. यामुळे हजारो शिक्षकांवर अन्याय होणार आहे.व तसेच नवीन भरती नसल्यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारावर टांगती तलवार निर्माण होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या इयत्ता ६ ते ८ वीच्या वर्गांना विषय शिक्षक मिळणार नाहीत. परिणामी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही. यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा घसरू शकतो. तसेच, राज्यातील हजारो विषय शिक्षक अतिरिक्त होणार असल्यामुळे त्यांच्या भविष्यासंदर्भातही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काय आहे बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार कायदा? बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ नुसार इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. २०१३-१४ पासून या कायद्याअंतर्गत शिक्षक निश्चिती करण्यात आली आहे. केंद्र शासनाने या निकषांमध्ये कोणताही बदल केलेला नाही. मात्र, महाराष्ट्र शासनाने स्वतःचे निकष तयार करून अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे दिसुन येत आहे. या नव्या निकषांमुळे कमी पटसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील शाळा बंद पडण्याची भीती आहे, त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागू शकते, जिल्हा परिषद शाळेत मात्र गोर गरीब जनतेचे मुले शिक्षण घेत असतात.त्यातसुद्धा सरकार मात्र मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याचे ग्रामीण भागातील जनता बोलताना दिसत आहे हे मात्र विशेष.

# कल्याण तहसीलदारांची अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तहसीलदार पथकाने अवैध रित्या खाडीतून रेती उपसा करणार्यांवर धडक कारवाईचा बडगा उचलित उंबर्डे परिसरातील कल्याण खाडीतील 4 बार्ज, 5 सक्शन पंप पेटवून देऊन बुडविल्याची कारवाई सोमवारी केली.

कल्याण खाडी परिसरातील उंबर्डे परिसरात सक्शन पंप आणि बार्ज यांच्या सहाय्याने अवैध रेती उपसा होत असल्याची बाब गस्ती दरम्यान समाजल्याने कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांचे पथक घटनास्थळी गेले. 4 बार्ज आणि 5 सक्शन पंपामार्फत अवैधरित्या वाळू उपसा करीत असल्याचे निर्दशनास आले. महसूल विभागाच्या पथकाला पाहताच अवैध रित्या रेती उपसा करणार्या अज्ञातांनी खाडी पाण्यात उड्या मारून पोहून जात पोबारा केला.

घटनास्थळी 4 बार्ज आणि 5 सक्शन पंप पथकाने ताब्यात घेत पेटवून देत पाण्यात अवैधरीत्या रित्या वाळू साम्रुगी बुडवली. या धडक कारवाई मुळे कल्याण खाडी पात्रात अवैधरित्या वाळू उपसा करणार्या वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. या 4 बार्जेसची अंदाजे किंमत 32 लाख तसेच 5 सेक्शन पंपाची अंदाजे किंमत 25 लाख होईल असे दोन्ही मिळून अंदाजे किंमत 57 लाख किंमतीची साधन सामुग्री नष्ट व नादुरुस्त करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दिली.

# सक्शन जेटींग मशीनमुळे चोकअपच्या तक्रारी होणार कमी

## शासनाकडून केडीएमसीला उपलब्ध झाली मशीन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभाग अंतर्गत मलवाहिन्या, भुमिगत मलवाहिन्या व त्यावरील चेंबर्स यांची वेळोवेळी स्वच्छता करणे व या कामामध्ये होणा-या दुर्घटना टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत मशिनरी पुरविण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी शासन व नगर परिषद संचालनालय यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे 18.5 टन क्षमतेची सक्शन अँन्ड जेटींग मशीन नगरपरिषद संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत मलनि:सारण (यांत्रिकी) विभागात (आवश्यक देखभाल व दुरुस्ती व परिचालनासाठी आवश्यक मनुष्यबळसह) प्राप्त झालेली आहे.

आता कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील मलवाहिन्या व त्यावरील चेंबर्सच्या सफाईसाठी दुसरी ७ टन ची मशीन शासनाकडून लवकर प्राप्त होणार असुन हि मशिन रात्रपाळीत चालविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील मलवाहिन्यांची आधुनिक पध्दतीने सफाई केली जाणार असल्याने चोकअप तक्रारी कमी होण्यास मदत होणार आहे.

## सॅटीस प्रकल्पाच्या कामासाठी

# कल्याण स्टेशन परिसरात वाहतुकीत बदल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण :कल्याण डोंबिवली स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत कल्याण रेल्वे स्टेशन आणि एसटी स्टँड परिसरातील सॅटीस प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर चालू आहे. यामुळे वाहतूक सुरळीत राहावी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. कल्याण पश्चिमेतील नेताजी सुभाषचंद्र बोस चौक ते कल्याण रेल्वे स्थानक आणि एसटी स्टँड दरम्यान सर्व प्रकारची अवजड वाहने आणि सरकारी तसेच खाजगी बसेस यांना प्रवेश बंद करण्यात आली आहे. हे निर्बंध 3 फेब्रुवारी 2025 पासून लागू करण्यात आले आहेत.

स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत हे निर्बंध कायम राहतील. पोलीस वाहने, रुग्णवाहिका, फायर ब्रिगेड आणि अत्यावश्यक सेवांना यातून सूट दिली जाईल. महात्मा फुले चौकातून कल्याण स्टेशन कडे येणाऱ्या वाहनांना सुभाष चौकात प्रवेश बंदी करण्यात आली असून, ही वाहने सुभाष चौक, प्रेम ऑटो सर्कल, आधारवाडी, दुर्गाडी गोविंदवाडी, पत्री पूल मार्गे गुरुदेव हॉटेल कडून एसटी डेपोत आणि याच मार्गे पुन्हा मार्गस्थ केली जाणार असल्याची माहिती वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांनी दिली .




## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते

# मुंबई विद्यापीठ संघातील खेळाडूंचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न झालेल्या आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरी करत उत्तम यश संपादन केले. त्याबद्दल राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विद्यापीठात संघाचा सत्कार करण्यात आला. या संघात एसएसटी महाविद्यालयाच्या 15 खेळाडूंचा समावेश होता.

यात मुलींच्या खो-खो संघात मीना कांबळे, कल्याणी कंक, किशोरी मोकाशी, रोशनी जुनघरे, दिव्या गायकवाड, काजल शेख तर मुलांच्या खो-खो संघात वैभव मोरे, अभय रत्नाकर, मयुरेश मोरे, निखिल कदम, संदेश सपकाळ यांचा तर कबड्डीमध्ये चिन्मय गुरव तसेच ॲथलेटिक्स प्रकारात निकिता मरले, रोहन चौधरी आणि बुद्धिबळ साठी अनिकेत पोटावाड या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यात बुद्धिबळ मध्ये अनिकेत पोटावाडने सुवर्णपदकाची कमाई केली तर मुलींच्या खो खो संघाने प्रथम स्थान प्राप्त केले, मुलांच्या खोखो संघाने तृतीय स्थान प्राप्त केले.

कबड्डीच्या मुलांच्या संघाने द्वितीय स्थान प्राप्त केले, तसेच ॲथलेटिक्स मुले आणि मुलींच्या संघाने द्वितीय स्थान प्राप्त केले. मुंबई विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स संघाचे कोच म्हणून एसएसटी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. राहुल अकुल यांनी यशस्वी कामगिरी पार पाडली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र- कुलगुरू प्राचार्य डॉ.अजय भामरे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी तसेच एसएसटी महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ.पुरस्वानी यांच्यासह महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ.खुशबू पुरस्वानी, सर्व शिक्षक, कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थ्यांनी खेळाडूंची अभिनंदन केले.

# केडीएमसी क्षेत्रात अभय योजनेला १५ मार्च पर्यंत मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कर व पाणीपटटी थकबाकीदारांसाठी महानगरपालिकेने "अभय योजना २०२४-२०२५" लागु केली असून या अभय योजनेला १५ मार्च पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाच्या कराच्या मागणीची संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास, नियम ४१ खालील शास्ती (दंड/व्याज) व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क माफीचे प्रमाण १०० टक्के आहे. तसेच संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाचे पाणी पट्टीची मागणीची संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास, शास्ती (दंड/व्याज) माफीचे प्रमाण १०० टक्के आहे. तरी सर्व थकीत मालमत्ता कर व पाणीपटटी करदात्यांनी विहीत मुदतीत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केडीएमसी आयुक्तांनी केली असल्याची माहिती उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी दिली.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# दिव्यांगांसाठी क्रीडा स्पर्धा,सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शनिवारी १ मार्च रोजी या दोन दिवसीय कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.नानासाहेब फडके क्रीडा संकुलात महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या शुभहस्ते सकाळी ११ वाजता या आयोजनाला सुरुवात झाली. यामध्ये २०० पेक्षा अधिक दिव्यांग स्पर्धकांनी भाग घेतला होता. या क्रीडा स्पर्धांमध्ये बुद्धिबळ, कॅरम अशा बैठ्या खेळांचा अंतर्भाव होता तर मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये गोळा फेक, नेमबाजी, व्हीलचेअर स्पर्धा, धावणे आदी स्पर्धांचा अंतर्भाव होता. तसेच रविवारी २ मार्च रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर येथे सांस्कृतिक कार्यक्रमांचे संपूर्ण सादरीकरण दिव्यांग व्यक्तींमार्फत केले गेले. अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.



# महाड येथील दिवाणी न्यायालयाच्या नुतन इमारतीचे भूमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्य सरकारने न्यायिक पायाभूत सुविधासाठी सातत्याने दरवर्षी सुमारे 1000 कोटी निधीची तरतूद केलेली आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या समितीकडून प्राप्त प्रस्तावाची तातडीने पूर्तता करून कामे मार्गी लावली आहेत. न्यायदानाच्या व्यवस्थेत असलेले पायाभूत सुविधांचे महत्त्व लक्षात घेऊन राज्य शासनाने न्यायिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यास विशेष प्राधान्य दिले आहे. त्यामुळे राज्यात अधिक गतीने न्यायदानास चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. रायगड जिल्ह्यातील महाड येथील दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर) न्यायालयाच्या नुतन इमारतीचे भूमिपूजन आणि कोनशिला समारंभ सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.भूषण गवई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर आयोजित मुख्य सोहळयात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च न्यायालय मुंबईचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले,उच्च न्यायालय न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती श्री. मिलिंद साठये, ग्राहक तक्रार निवारण आयोग अध्यक्ष सुरेंद्र तावडे, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रायगड-अलिबाग डॉ. सृष्टि नीलकंठ, महाड वकील संघ,अध्यक्ष ॲड संजय भिसे, महाडचे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) प्रविण उन्हाळे आदी मान्यवर उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळ असलेले महाड ही स्वराज्य, क्रांती आणि समता भूमी आहे. या ठिकाणी न्यायालय भूमिपूजन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणे ही सन्मानाची गोष्ट असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चवदार तळे आंदोलन ही सत्याग्रह आणि कायदेशीर लढाई होती. हे केवळ पाण्याचे आंदोलन नव्हते तर यामुळे देशाची दशा आणि दिशा बदलली. यामुळे समतेची, माणुसकीची क्रांती घडली. हा देशाच्या सांस्कृतिक परिवर्तनाचा विजय असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाड येथील न्यायालय इमारत सुसज्ज,दर्जेदार होण्यासाठी शासनामार्फत सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल. यासाठी निधीची कमतरता पडणार नाही तसेच इमारतीचे काम विक्रमी वेळेत पूर्ण केले जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले देशातील तीन नवीन गुन्हेगारी कायद्यांमुळे गुन्हे तपास, न्यायदान, फॉरेंसिक प्रक्रिया अधिक आधुनिक आणि प्रभावी होणार आहे. या नव्या कायद्यांनुसार, येत्या काळात आरोपींना वारंवार कोर्टात हजर करण्यासाठी प्रत्यक्ष नेण्याची गरज भासू नये यासाठी सरकारने



मोठे पाऊल उचलले आहेत. राज्यातील सर्व न्यायालये इंटरनेट ने जोडण्यात येणार असून नोटिफाइड क्यूबिकल्स तयार करण्यात येत आहेत. हे क्यूबिकल्स तुरुंगांशी ऑनलाइन जोडले जातील. यामुळे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सुनावणी शक्य होईल. वेळेअभावी आणि साक्षी अभावी खटले प्रलंबित राहणार नाही. न्यायदानाचे काम जलद व गतीने होईल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले. नव्या कायद्यांनुसार, केस लांबवण्यासाठी वारंवार तारखा मागता येणार नाहीत, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे खटल्यांचा निकाल लवकर लागेल आणि न्यायदान प्रक्रियेला गती मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.न्यायालयाच्या माध्यमातून प्रभावी न्यायदानाचे काम सुरु आहे. खटले लवकर निकाली निघावेत, किंवा खटले होऊच नये याकडे लक्ष द्यावे लागेल, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर येथे लॉ स्कुल उभारण्यात येणार आहेत. या माध्यमातून चांगले विधीज्ञ तयार होतील, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले, महाराष्ट्रात न्यायिक पायाभूत सुविधा उच्च दर्जाच्या आहेत. शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचला पाहिजे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. न्याय हा पक्षकाराच्या दारी पोहोचला पाहिजे हे आपले

### राज्य शासनाचे न्यायिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यास विशेष प्राधान्य -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

धोरण आहे. यासाठी महाड येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालयास राज्य शासनाने मान्यता द्यावी. तसेच नवी मुंबई येथे उभारण्यात येत असलेल्या देशातील पहिल्या ॲडव्होकेट अकादमी ॲंड रिसर्च सेंटरला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. तसेच यासाठी वाढीव निधीची तरतूद करावी, अशी मागणी न्यायमूर्ती श्री. गवई यांनी यावेळी केली. ऐतिहासिक ठरलेल्या खटल्यामध्ये स्वतः डॉक्टर आंबेडकर यांनी महाड न्यायालयात येऊन सत्याग्रहींची बाजू मांडली होती असे सांगून या संदर्भातील संपूर्ण घटनाक्रम न्या. गवई यांनी यावेळी सांगितला. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, सर्व सामान्य माणसाला जलदगतीने न्याय देण्यासाठी राज्य शासन सर्वोतोपारी प्रयत्नशील आहे. राज्यात 32 न्यायालये बांधली गेली असून त्यामाध्यमातून न्यायासंदर्भात तातडीने कामकाज होत आहेत.गेल्या तीन वर्षात राज्यात 32 न्यायालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच रिक्त पदे भरती, डिजिटायझेशन करण्यात आले आहे. यामुळे न्यायव्यवस्थेला गती मिळाली आहे. सध्याच्या युगामध्ये आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञान आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही काळाची गरज असून शेवटच्या घटकाला यामुळे अधिक गतीने न्याय मिळेल असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. महाड न्यायालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल तसेच या इमारतीच्या माध्यमातून न्याय दानाचे काम जलदगतीने होईल असा विश्वासही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी सांगितले की आजचा दिवस अतिशय आनंदाचा दिवस आहे. 2008 पासून या इमारतीसाठी प्रयत्न सुरु होते. या इमारतीच्या माध्यमातून जनतेला न्यायाची सुविधा मिळेल. न्यायचे विकेंद्रीकरण या निमित्ताने होईल. 33 कोटींचा निधी या इमारतीसाठी मंजूर झाला असून पुरेसा निधी राज्यशासनाने उपलब्ध करून दयावा असेही कु तटकरे यांनी सांगितले. चवदार तळयास भेट कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चवदार तळे येथे भेट देऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, रोहयो मंत्री भरत गोगावले, विभागीय आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी, पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

# राज्यपालांच्या अभिभाषणाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाची प्रारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणाने आज राज्य विधान मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली. विधानमंडळ आवारात राज्यपालांच्या आगमनप्रसंगी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.प्रथेप्रमाणे राज्यपालांना विधानभवन आवारात राज्य पोलीसांकडून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर राज्यपालांनी राज्य विधान मंडळाच्या संयुक्त बैठकीला संबोधित केले.

# कल्याण तालुका पोलीस ठाण्याचा दूरध्वनी बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण :

कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशन च्या टिटवाळा पोलीस स्टेशनचा लँडलाईन नंबर बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत थेट पोलिसांशी संपर्क साधण्याचा हा सोपा मार्ग पूर्णतः बंद पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस यंत्रणा सज्ज असावी, अशी अपेक्षा असते, पण सध्या टिटवाळा पोलीस स्टेशन मधील बंद असलेल्या दूरध्वनी कधी सुरू होणार असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

सामान्य नागरिक गुन्हेगारीच्या घटनांबाबत तक्रार नोंदवण्यासाठी किंवा मदतीसाठी थेट पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात. मात्र, सध्या हा क्रमांक बंद असल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यावर काही पोलीस ठाण्यांसाठी सरकारने अधिकृत मोबाईल क्रमांकही दिले आहेत, पण हे नंबर नागरिकांपर्यंत पोहोचलेले नाहीत. ज्यांना हे क्रमांक माहीत आहेत, त्यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता अनेकदा फोन उचलला जात नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते.

डायल 112 हा पर्याय उपलब्ध असला तरी अनेक वेळा कॉल्सला उशिरा प्रतिसाद मिळतो. त्यामुळे पोलिस ठाण्याचा दूरध्वनी बंद असल्याने नागरिक अक्षरशः हतबल झाले आहेत. यामुळे पोलीस ठाणे आणि जनतेतील अंतर वाढत असून सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला अनेकदा तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कुठलाही ठोस उपाय करण्यात आलेला नाही. पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे जर एखादी गंभीर घटना घडली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न दक्ष नागरिक उपस्थित करत आहेत. पोलीस ठाण्याशी संपर्क तातडीने सुरळीत करावा आणि नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी केली जात आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असेही नागरिकांनी स्पष्ट केले आहे.

"या संदर्भात टिटवाळा पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेश कदम यांनी लँडलाईन दूरध्वनी सुरूहोणेबाबत काम चालू असल्याचे सांगितले."

# प्रशिक्षणांमधून शिक्षकांचे नेतृत्व गुणांचा विकास होतो - आ. ज्ञानेश्वर म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिक्षकांना एकत्रितपणे प्रयत्न व क्षमतांचा वापर करून आपल्या शाळेचे नावलौकिक वाढवावे. अशा प्रशिक्षणांमधून शिक्षकांचे नेतृत्व गुणांचा विकास होतो. दोन वर्षाच्या आमदारकीच्या कालावधीत ठाणे,पालघर, सिंधुदुर्ग, रायगड आणि रत्नागिरी या पाचही जिल्ह्यांमध्ये 25 कोटी रुपयाचे डिजिटल शैक्षणिक साहित्य आणि सोलर पॅनलचे वाटप आपण केले. यापुढील कालावधीत कोकण विभागातील सर्व




शाळा, तंत्रस्नेही अद्ययावत करण्याचे आपले ध्येय आहे असे शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण केंद्रातील शिक्षकांना मार्गदर्शन करताना कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सांगितले.

ठाणे महानगरपालिका शाळा क्र. 44, वर्तकनगर, ठाणे येथे संपन्न झालेल्या शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण केंद्राला कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर मात्रे यांनी दि.01 मार्च 2025 रोजी सदिच्छा भेट देऊन शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी गट प्रमुख अनघा पालांडे, शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, मनोहर पाटकर, जगन्नाथ जाधव, प्रशिक्षण समन्वयक दिलीप शेवाळे, सविता गोसावी, महेंद्र राऊत उपस्थित होते. तसेच मनिषा राजपूत, वर्षा कदम, मयुरी देवकर, सचिन घोडे, शोभा लोखंडे, मयुरी कदम, मनिषा खताळ, शारदा चौधरी, सिध्दी नाईक, शिल्पा टेंबे, विद्या चव्हाण, मारुती कचरे यांनी सुलभक म्हणून काम पाहिले. प्रशिक्षणानंतर शिक्षकांनी आपल्या समस्या समोर मांडल्या. सदर समस्यांचे निराकरण लवकरात लवकर करण्याचे आश्वासन आ.म्हात्रे सरांनी दिले.

# पिंपरीतील दत्तकृपा पतसंस्थेच्या शाखेत चोरीचा प्रयत्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : लोणी मावळा - पिंपरी जलसेन च्या दत्तकृपा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या लोणी मावळा शाखेचे चोरट्याने शटर तोडून पतसंस्थेत चोरी करण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांना हाती काही लागले नाही .

पिंपरी जलसेनच्या दत्तकृपा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची लोणी मावळा येथील बस स्थानका जवळ शाखा असून चोरट्याने काल रात्री पतसंस्थेच्या पाठीमागील बाजूस येऊन वीजेच्या मीटरची वायर तोडून तेथे अंधार केला. अंधाराचा फायदा घेऊन पतसंस्थेच्या बाहेर बसविण्यात आलेल्या सी सी टि व्ही कॅमेऱ्याच्या वायरी तोडल्या व पतसंस्थेच्या दक्षिण बाजूस असणारे शटर लोखंडी हत्याऱ्याच्या साह्याने उचकटून आत मध्ये प्रवेश करून त्यांनी प्रथम सी सी टि व्ही कॅमेरे काढून टाकले व तिजोरी गॅस कटरच्या साह्याने तोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तिजोरी त्यांना तोडता न आल्याने चोरट्यांना रिकाम्या हाताने पाठीमागे जावे लागले. या पतसंस्थेच्या शेजारीच बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण पतसंस्थाची शाखा असून या पतसंस्थेची देखील मागील काही दिवसांपूर्वी चोरट्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला. राऊत वाडी च्या देवी भोयरे फाटा येथील राऊत बाबा पतसंस्थेच्या मागील बाजूस भिंतीला छिद्र पाडून पतसंस्थेत प्रवेश केला होता . त्या ठिकाणीही तिजोरी न फुटल्याने तेथूनही चोरट्यांना रिकाम्या हाताने जावे लागले होते.

काल रविवार दि . २ रोजी सकाळी ग्रामस्थ गावात बस स्थानक परिसरात आल्यावर पतसंस्थे त चोरी झाल्याची लक्षात आले. त्यावेळी त्यांनी संस्थेचे शाखाधिकारी राहुल लाळगे यांच्याशी संपर्क साधला असता , त्यांनी संस्थेचे संस्थापक चेअरमन लहुजी थोरात यांना या घटनेची माहिती दिली व त्यांनी पारनेर पोलीसांशी संपर्क साधून तक्रार दाखल केली व तदनंतर पोलिस हेड कॉन्स्टेबल मनिषा चौहान संपत लंके, जालिंदर लोंढे यांनी घटनास्थळी भेट देऊन सदर जागेची पाहणी करून पंचनामा केला . नेहमी प्रमाणे त्यांनी लवकरात लवकर या चोरीच्या घटनेचा तपास लावला जाईल व आरोपी जेरबंद केले जाईल असे , नेहमीच्या पद्धतीचे आश्वासन देवून ग्रामस्थां चे समाधान केले .

पारनेर तालुक्यात चोरीच्या विशेषतः वा इतर घटना घडत असताना पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या नेतृत्वाखालील पोलीस कर्मचारी करता काय ? अलीकडच्या काळात पारनेर पोलीसांनी एक तरी घटनेचा तपास करून मोठा गुन्हा उघडकीस आणून मुद्देमालासह आरोपींना ताब्यात घेतल्याचे उदाहरण दिसून येत नाही . त्यांचे नेहमी प्रमाणे तपास केला जाईल , घटना उघडकीस येईल , मुद्देमाल जप्त केला जाईल , आरोपींना ताब्यात घेतले जाईल , असे थातूर मातूर उत्तर देवून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला जातो . शेवटी ज्याचे नुकसान होते , त्यालाच सोसावे लागते .

# माणगाव मध्ये महास्वच्छतेसाठी श्रीसदस्य एकवटले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : रविवार दिनांक २ मार्च २०२५ रोजी जेष्ठ निरुपणकार महाराष्ट्र भूषण ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने ति. डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी, ति. डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाने देशभरात महास्वच्छता अभियान मोहिमेला सुरुवात करण्यात आली. धर्माधिकारी यांची कर्मभूमी असलेल्या रायगड जिल्हयासह महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून रविवारी सकाळी ९.०० वाजता या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

हजारो श्री सदस्य प्रत्येक गाव, खेडयात व शहरात ठिकठिकाणी जाऊन स्वच्छता करताना पाहायला मिळाले. माणगांव नगरपंचायत व ग्रुप ग्राम पंचायत गोरेगांव येथे महास्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

माणगाव शहरात या स्वच्छता अभियानामध्ये १५२० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. माणगावमधील तहसिल कार्यालय परिसर, प्रांत कार्यालय, पोलिस स्टेशन, कचेरी रोड, बाजारपेठ, मुंबई गोवा हायवे, निजामपूर रोड, उपजिल्हा रुग्णालय, मोर्बा रोड, जिल्हापरिषद



शाळा, बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसर, महाराण प्रताप नगर रस्ता, पंचायत समिती, स्मशान भूमी आणि मच्छी मार्केट परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्रीसदस्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्या उचलून परिसर स्वच्छ केला. तसेच गटारामधील ओला कचरा सुद्धा स्वच्छ करण्यात आले. यासाठी एकूण २२ वाहनांचा वापर करुन २८ टन ओला आणि ४४ टन सुका असा एकूण ७२ टन कचरा उचलण्यात आला. माणगांव नगरपंचायतीचे नगरसेवक नितीन वाढवळ, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, माजी नायब तहसिलदार सुरेश वाढवळ, नगरपंचायत स्वच्छता प्रमुख अतुल जाधव व प्रांत कार्यालय महसुल सहाय्यक दिनेश पाचाडकर तसेच इतर संघटनांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच ग्रुपग्रामपंचायत गोरेगाव हद्दीत १२१४ श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानामध्ये ग्रुप ग्रामपंचायत गोरेगावचे प्रांगण, गोरेगाव पोलिस स्टेशनचा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, गोरेगाव बस स्थानक, विष्णू तलाव गोरेगाव, गाव तलाव गोरेगाव, रायगड जिल्हा परिषद उर्दू शाळा, रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा, ए. के. आय. हायस्कूल, बौध्द विहार, मस्जिद आणि स्मशानभूमीतील परिसर स्वच्छता करण्यात आली. यासाठी एकूण १० वाहनांचा वापर करुन १४ टन ओला आणि २४ टन सुका असा एकूण ३८ टन कचरा उचलण्यात आला. यावेळी गोरेगांव ग्रामपंचायत सरपंच जुब्बेर अब्बासी व इतर मान्यवर उपस्थित होते. माणगांव नगरपंचायत व ग्रामपंचायत गोरेगांव महा स्वच्छता अभियान यशस्वी करण्याकरिता एकूण २७३४ श्रीसदस्य सहभागी झाले होते. एकूण दोन्ही मिळून ४२ टन ओला कचरा व ६८ टन सुका कचरा उचलण्यात आला.


# गणेशपुरी परिसरात अनोळखी इसमाचा अपघाती मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलीस स्टेशन हद्दीत मौजे-अंबाडीनाका-दलोंडे रस्त्यावर गुरूवार दिनांक-27/02/2025 रोजी रात्री ठीक 11वाजण्याच्या सुमारास एका अनोळखी इसमास अंबाडीनाका येथून पडघा-वासिंद कडे जाणाऱ्या अज्ञात वाहन चालकाकडून आपल्या निष्काळजीपणे भरधाव वेगात वाहन चालवण्यामुळे सदर अनोळखी इसमाच्या डोक्याला जबरी मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झालेला आहे.असे गणेशपुरी पोलीस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

सदर मयत इसमाच्या मृत्यूनंतर गणेशपुरी पोलीसांकडून त्यांच्या नातेवाईकांच्या शोधकामी मृत शरीर भिवंडी येथील आयू.जी.एमू.रूग्णालयात ठेवण्यात आला आहे,सदर अपघाती मृत्यूची नोंद गणेशपुरी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजि.नंबर 30/2025 बी.एन.एस.कलम106 (1) 281,125,(अ),125(ब) कलम 184,187 दिनांक-28/02/2025 याप्रमाणे रीतसर गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. या अपघाती घटनेची चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखालीच पोलीस उपनिरीक्षक गजानन राऊत करीत आहेत.या अनोळखी मृत इसमाच्या बाबतीत ओळखपरेड होण्यासाठी त्याचे अंदाजे वयवर्ष-60,उंची 5फूट4 इंच,अंगाने सडपातळ,रंग सावळा,अंगात फूल शर्ट,काळ्या रंगाची फूल स्पोर्ट् पॅण्ट अशा वर्णनाची माहिती गणेशपुरी पोलीस यांच्याकडून वृत्त प्रसिद्धीस देण्यात येत आहे,व सदर मृतदेह नातेवाईक यांच्या ओळखपरेडसाठी दहा दिवस रूग्णालयात ठेवण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

# महाबोधी बुद्ध विहार मुक्ती आंदोलनास वंचितचा पाठिंबा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता उल्हासनगर : तथागत गौतम बुद्धास प्रज्ञा प्राप्त झालेल्या महाबोधी विहारात आता हिंदू देवतांची स्थापना व हिंदुत्वांचा वावर वाढल्याने संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धांच्या ताब्यात द्यावं या मागणी करिता गेले वीस दिवस शेकडो भरतीचे या ठिकाणी उपोषणास बसले आहे. यात आंदोलक भतींना आपलं समर्थन दर्शवण्यासाठी उल्हासनगर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मूक मोर्चा काढून प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. भंते संघ व बौद्ध बांधवांनी चालवलेल्या महाबोधी बुद्ध विहार मुक्ती आंदोलनाला मजबूत करण्यासाठी उल्हासनगर शहरातून वंचित बहुजन आघाडी उल्हासनगर पच्छिम शहराच्या व भारतीय बौद्ध महासभा उल्हासनगर तालुक्याच्या वतीने महाबोधी बुद्ध विहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा जाहीर केलाय.

यावेळी धम्मगुरू धम्मप्रिय भंतेजीं व संघ तसेच वंचित बहुजन आघाडी प. भारतीय बौद्ध महासभा उल्हासनगर यांच्या नेतृत्वाखाली उल्हासनगर शहराध्यक्ष मा.ॲड.उज्वल रतन महाले, रोशन पगारे ,वरिष्ठ कार्यकर्ते भालचंद्र ब्राम्हणे, नेते मा.सारंग थोरात, निलेश देवडे, ईश्वरभाऊ सोनवणे, .दिवाकर कल्पनाताई वानखेडे,सुमनताई वाघ,रेखाताई ओंकार, आदी उपस्थित होते.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४९८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024